शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यांच्याशी संलग्नित रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक संवर्गाचा विषयनिहाय आकृतीबंध..

**सहयोगी प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसीन (आय.सी.सी.यु.)**

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शासन निर्णय क्र. : **File No.:MEDD-12021/29/2024-MMD(Vais-2)/८५६५३१**

९ वा मजला, नवीन गो.ते.रु.इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,

नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

दिनांक:- १७ फेब्रुवारी, २०२५

**वाचा :-** १) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदनि-२०२०/प्र.क्र.१०८/२०/वैसेवा-२, दि.२९.०१.२०२१

२) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदनि-२०२०/प्र.क्र.१२३/वैसेवा-२, दि.२९.०१.२०२१

३) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.१२ (भाग-१)/१९/ वैसेवा-२, दि.०१.०२.२०२१

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे दिनांक २४.०२.२०२१ चे पत्र

५) वै.शि.व औ.द्र.वि., शा.नि. क्र.पदआ-२०२१/प्र.क्र.४०/२१/वैसेवा-२, दि.१७.०३.२०२१

६) वै.शि.व औ.द्र.वि., शा. नि. पदनि-२०२२/प्र.क्र.२४६/२२/वैसेवा-२, दि.२२.११.२०२३

७) वै.शि.व औ.द्र.वि., शा. नि. एमईडीडी-१७.०२६/४३/२०२४-एमएमडी(वैसेवा-१)/८१८९१८, दि.१०.१०.२०२४

**शासन निर्णय** :-

संदर्भ क्र. १, २ व ४ येथील शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदूर्ग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे पदनिर्मिती करण्यात आलेली असल्याने शासन निर्णय दि.१७.०३.२०२१ अन्वये सहयोगी प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसीन (आय.सी.सी.यु.) संवर्गाचा संस्थानिहाय आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. तद्नंतर धाराशिव, परभणी व नंदुरबार येथील पद निर्मितीमुळे शासन निर्णय दि.२२.११.२०२३ अन्वये सहयोगी प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसीन संवर्गात एकूण ०७ पदांचा संस्थानिहाय आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.

२. आता, संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे ०१ पद निर्मिण करण्यात आले असल्याने सहयोगी प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसीन या संवर्गात एकूण ०१ पदाची वाढ झाली आहे. त्यामुळे शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दि.२२.११.२०२३ अन्वये मंजूर केलेला आकृतीबंध व तदनंतर नव्याने निर्माण केलेली पदे विचारात घेऊन सहयोगी प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसीन संवर्गाचा संस्थानिहाय आकृतीबंध पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|
| १. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग | १ |
| २. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग | १ |
| ३. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा | १ |
| ४. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद | १ |
| ५. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार | १ |
| ६. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी | १ |
| ७. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी | १ |

| | | |
|---|---|---|
| ८. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज | १ |
| | एकूण | ८ |

सहयोगी प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसीन (आय.सी.सी.यु.) या विषयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयनिहाय हा आकृतीबंध अंतिम आहे. त्यामुळे कोणत्याही अध्यापकाच्या वैयक्तिक हिताकरीता यापुढे एका विषयातील पद दुस-या विषयात रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास तो मान्य केला जाणार नाही.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.द.धोंडे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये. (संचालक, वै.शि. व सं. मुंबई यांचेमार्फत)
४) निवड नस्ती (वैसेवा-२).